**L. C. BILL No. XV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF BEGGING ACT.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १५.**

**महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

१९६० चा १०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

एचबी ११८३—१

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— १९६० चा १०.

(अ) खंड (चार) मधील, " मुंबई बाल अधिनियम, १९४८" या मजकुराऐवजी, "बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; १९४८ चा मुंबई ७१.

(ब) खंड (चार) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— २०१६ चा २.

"(चार-अ) "बाल कल्याण समिती" याचा अर्थ, बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या कलम २७ अन्वये घटित केलेली बाल कल्याण समिती, असा आहे ;"; २०१६ चा २.

(क) खंड (सहा) वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, "किंवा बाल न्यायालय," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम ५८" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील, पोट-कलम (९) वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ८ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (४) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ४८८" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १४४" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ९ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(१) पोट-कलम (२) मधील,—

(अ) "न्यायालयाने त्यास बाल न्यायालयाकडे" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "व्यवस्था करावी" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"न्यायालय त्याला बाल कल्याण समितीकडे पाठविल, जी बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या तरतुदीनुसार मुलांच्या संबंधात कार्यवाही करील.". २०१६ चा २.

(ब) परंतुकातील, "संसर्गजन्य महारोगाने पीडित नसलेला किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम ५८" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये,— सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २६ ची सुधारणा.

(अ) समासटीपेमधील, "महारोगी व" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (१) मध्ये, "किंवा महारोगी" हा मजकूर ज्या दोन्ही ठिकाणी आला आहे आणि "किंवा कुष्ठालयांत" हा मजकूर, वगळण्यात येईल ;

(क) पोट-कलम (२) मधील, "किंवा तो महारोगापासून बरा झाला आहे" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ड) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

२०१७ चा १०. "(३) मानसिक आरोग्य देखभाल अधिनियम, २०१७ याच्या तरतुदी, पोट-कलम (१) अन्वये वेड्यांच्या इस्पितळात अटकावून ठेवलेल्या भिकाऱ्यास ज्या कालावधीसाठी अटकावून ठेवण्याचा आदेश दिला होता तो कालावधी समाप्त झाल्यानंतर, अशा प्रत्येक भिकाऱ्यास लागू होतील ; आणि त्या पोट-कलमान्वये भिकाऱ्यास ज्या मुदतीत वेड्यांच्या इस्पितळात अटकावून ठेवलेले असेल ती मुदत, त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला असता त्या मुदतीचा भाग म्हणून गणण्यात येईल :

परंतु, जेव्हा मनोविकलतेमुळे भिकाऱ्यास ताबडतोब हलविणे आवश्यक असेल त्याबाबतीत, ज्या संस्थेत भिकाऱ्यास अटकावून ठेवण्यात आलेले असेल त्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यांना, ज्या मुदतीत राज्य शासनाचा आदेश मिळविता येऊ शकेल अशा मुदतीपर्यंत, भिकाऱ्यास वेड्यांच्या इस्पितळाच्या स्वाधीन करण्याकरिता ताबडतोब आदेश मिळविण्यासाठी, उक्त अधिनियमान्वये अधिकारिता असणाऱ्या न्यायालयाकडे अर्ज करण्याची मुभा असेल.".

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये,— सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३० ची सुधारणा.

१८९० चा ११. १९६० चा ५९. (अ) पोट-कलम (२) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम ६ब" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३५" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८९० चा ११. १९६० चा ५९. (ब) पोट-कलम (३) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८९० चा ११. १९६० चा ५९. (क) पोट-कलम (४) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. **१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मधील, "भारतीय दंड संहितेच्या" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३२ ची सुधारणा.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मधील, “दंड प्रक्रिया संहिता, १८९८” या मजकुराऐवजी, “भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मधील, “दंड प्रक्रिया संहिता, १८९८” या मजकुराऐवजी, “भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (१९६० चा १०) यामध्ये महाराष्ट्र राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध करण्याच्या संबंधातील आणि त्याच्याशी संबंधित बाबींकरिता केलेल्या तरतुदी अंतर्भूत आहेत.

२. सर्वोच्च न्यायालयाने, फेडरेशन ऑफ लेप्रसी ऑर्गनायझेशन (एफओएलओ) आणि इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर (रिट पिटीशन (सी) क्रमांक ११५१/२०१७ यासह रिट याचिका (दिवाणी) क्रमांक ८३/२०१०) यामध्ये दिलेल्या ७ मे २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे, ज्यामध्ये, महारोग पीडित किंवा त्यातून बरे झालेल्या व्यक्तींच्या बाबतीत, भेदभावकारी शब्दप्रयोग अंतर्भूत आहेत असे संविधानापूर्वीचे किंवा त्यानंतरचे राज्य कायदे, विनियम, सांविधिक नियम किंवा उप-विधि, इत्यादींमध्ये सुयोग्य सुधारणा करण्यासाठी सर्व राज्यांना निर्देश दिले आहेत.

३. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे पालन करण्यासाठी, शासनाने, राज्य अधिनियमांमधील अशा भेदभावकारी तरतुदी सुनिश्चित करण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या अंतर्गत एक समिती घटित केली होती. उक्त समितीने असे निश्चित केले आहे की, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम याची कलमे ९ व २६ यामध्ये, महारोग पीडित किंवा त्यातून बरे झालेल्या व्यक्तींच्या बाबतीतील अशा तरतुदी अंतर्भूत आहेत आणि म्हणून, उक्त अधिनियमामध्ये सुयोग्य सुधारणा करण्याची समितीने शिफारस केली आहे. त्यामुळे, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम याची कलमे ९ व २६ यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे वाटते.

४. उक्त अधिनियमामधील, निरसित केलेल्या केंद्रीय व राज्य अधिनियमांऐवजी विद्यमान केंद्रीय अधिनियमांचे संदर्भ दाखल करण्यासाठी उक्त अधिनियमात परिणामस्वरूप सुधारणा करण्याची संधी देखील घेण्यात आली आहे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ८ डिसेंबर, २०२५.

**आदिती तटकरे,**
महिला व बालविकास मंत्री.

**सन २०२५ चे वि. प. विधेयक क्रमांक १५ महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५**

**(महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम यातील उतारे)**

**(सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०)**

**१.** ** ** ** ** व्याख्या

**२.** (१) ह्या अधिनियमांत, संदर्भावरुन अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर. -

(१) व (३) ** ** ** **

(४) "मूल" या शब्दाचा अर्थ, त्यास जो अर्थ मुंबई बाल अधिनियम, १९४८ मध्ये दिला आहे तोच असेल ;

(५) ** ** ** **

**(६)** " बाल न्यायालय या संज्ञेचा अर्थ, त्यास जो अर्थ, मुंबई बाल अधिनियम, १९४८ मध्ये दिला आहे तोच असेल;

(७) ते (११) ** ** ** **

(२) ** ** ** **

न्यायालयांचे अधिकार

**३.** ह्या अधिनियमान्वये न्यायालयांस दिलेले अधिकार उच्च न्यायालय, सेशन न्यायालय, प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश किंवा बाल - न्यायालय किंवा क्षेत्रांत फौजदारी क्षेत्राधिकार चालविणारे इतर कोणतेही न्यायालय यांनीच फक्त चालविले पाहिजेत व ते अशा न्यायालयांनाच चालविता येतील, मग प्रकरण त्यांच्यापुढे प्रारंभतः येवो किंवा अपिलांत येवो किंवा फेरतपासणीसाठी येवो.

भीक मागतांना आढळून आलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

**४.** (१) व (२) ** ** ** **

(३) दंड प्रक्रिया संहिता १८९८ कलम ६१ याचे उपबंध या कलमान्वये केलेल्या प्रत्येक अटकेच्या बाबतीत लागू असतील, आणि अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करण्यात येईपर्यंत पोलीस ठाणे किंवा विभाग (सेक्शन) स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्याने त्यास विहित केलेल्या रीतीने ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**५.** (१) ते (८) ** ** ** **

भीक मागत असतांना आढळलेल्या व्यक्तीच्या बाबतीत संक्षिप्त चौकशी व त्यांना अटकावून ठेवणे.

(९) ह्या कलमांत काहीही असले तरी, वर सांगितल्याप्रमाणे भिकारी म्हणून आढळून आलेली व्यक्ती ही जर पांच वर्षे वयाहून कमी नाही इतक्या वयाचे मूल असेल तर, न्यायालयाने त्यास बाल न्यायालयाकडे पाठविले पाहिजे व पोट-कलम (५) अन्वये कोणताही आदेश देता कामा नये. मुंबई बाल अधिनियम, १९४८, कलम ४०, कंडिका (अ) यात वर्णन केल्याप्रमाणे ते मूल आहे असे समजून, बाल - न्यायालयाने अशा मुलाची उक्त कलमान्वये व्यवस्था केली पाहिजे. अशा इसमाची वयाबद्दल खात्री करून घेण्याकरिता आवश्यक वाटल्यास अशा भिकाऱ्यास वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासून घेवविण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

**६.** व **७.** ** ** ** **

**८.** (१) ते (३) ** ** ** ** आईबापांनी खर्चाबाबत रकमा देणे.

(४) दंड प्रक्रिया संहिता, १८९८ कलम ४८८ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी ज्या रीतीने करण्यात येते त्याच रीतीने ह्या कलमान्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करता येईल.

सर्वस्वी भिकाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

**९.** (१) ** ** ** **

(२) अवलंबून असलेली व्यक्ती ही जेव्हां मूल असेल तेव्हां, न्यायालयाने तीस बाल-न्यायालयाकडे पाठविले पाहिजे व मुंबई बाल अधिनियम, १९४८ कलम ४०, कंडिका (अ) यात वर्णन केल्याप्रमाणे ती मूल आहे असे समजून बाल न्यायालयाने तिची व्यवस्था करावी :

परंतु जेव्हां अवलंबून असलेली व्यक्ती. पाच वर्षे वयाहून कमी असून भिकाऱ्याचे स्वतःचे मूल असेल व भिकारी संसर्गजन्म महारोगाने पीडित नसलेला किंवा वेडी नसलेली अशी धडधाकट आई असेल तेव्हां असे मूल पाच वर्षाचे होईपर्यंत अटकावून ठेवण्याच्या जागेच्या संबंधात आईपासून वेगळे न करता प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे व त्यानंतर ह्या पोट-कलमान्वये तरतूद केल्याप्रमाणे तिची व्यवस्था करण्यात येईल.

(३) ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता, आवश्यक असल्यास अवलंबून असलेल्या व्यक्तीस अटक करून आपणासमोर आणण्यास सांगण्याचा आणि वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तिची तपासणी करवून घेण्याचा न्यायालयास अधिकार आहे, ह्या पोट-कलमान्वये केलेल्या प्रत्येक अटकेच्या, दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१ याचे उपबंध लागू असतील आणि अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करण्यात येईपर्यंत पोलीस ठाणें किंवा विभाग (सेक्शन) स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्याने विहित केलेल्या रीतीने तिला ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१०. ते २५.** ** ** ** **

महारोगी व वेडे यांची वैद्यकीय तपासणी व त्यांस अटकावून ठेवणें.

**२६.** (१) न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेला कोणताही भिकारी विकृतचित किंवा महारोगी आहे असें राज्य शासनास वाटेल तेव्हां राज्य शासनास असें भिकारी विकृचित्त किंवा महारोगी आहे असें त्यास वाटण्याची कारणें आदेशांत नमूद करून अशा व्यक्तीस वेडयांच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत इतर सुरक्षित ठिकाणी हलविण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. अशा भिकाऱ्यास राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे, त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश दिलेला असेल त्या मुदतीच्या उरलेल्या काळांत किंवा ती मुदत संपल्यावर वैद्यकीय अधिकाऱ्यानें असें प्रमाणित केले की भिकाऱ्याच्या किंवा इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें त्यास वैद्यकीय व्यवस्थेखाली किंवा उपचाराखाली आणखी अटकावून ठेवणें आवश्यक आहे तर, विधी अन्वये मुक्त करण्यांत येईपर्यंत त्यास त्या ठिकाणी ठेवलें पाहिजे व त्याच्यावर उपचार केले पाहिजेत.

(२) राज्य शासनास जेव्हा असे वाटले की, भिकारी विकृतचित्त असण्याचे बंद झाले आहे किंवा तो महारोगापासून बरा झाला आहे तेव्हा राज्य शासनाने ज्या व्यक्तीच्या ताब्यात भिकारी असेल त्या व्यक्तीस आदेशाद्वारे निदेश देऊन, जर भिकारी अजूनही अभिरक्षेत ठेवला जाण्यास पात्र असेल तर, भिकाऱ्यास ज्या प्रमाणित संस्थेमधून हलविण्यांत आले असेल त्या प्रमाणित संस्थेमध्ये पाठविले पाहिजे किंवा भिकारी त्यापुढे अभिरक्षेत ठेवला जाण्यास पात्र नसेल तर, त्यास मुक्त करण्याचा आदेश दिला पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें वेड्याच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत ठेवलेल्या प्रत्येक भिकाऱ्यास, ज्या मुदतीपर्यंत त्यास अटकावून ठेवण्याचा आदेश देण्यांत आला असेल ती मुदत संपल्यानंतर, भारताचा वेड लागलेल्या इसमांबाबत अधिनियम, १९१२ कलम ३१ याचे उपबंध किंवा [ पोट-कलम (२) च्या उपबंधांस अधीन राहून] महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ कलम १४ याचे उपबंध लागू होतील आणि एखाद्या भिकाऱ्यास त्या पोट-कलमान्वयें ज्या मुदतींत वेड्यांच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत ठेवण्यांत आले असेल ती मुदत न्यायालयानें त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल त्या मुदतीचा भाग म्हणून मोजली पाहिजे :

परंतु एखाद्या भिकाऱ्यास त्याच्या विकृतचित्तामुळे किंवा महारोगामुळे ताबडतोब हलविणें आवश्यक असेल तेव्हां त्या गोष्टीबाबत राज्य शासनाचे आदेश मिळविण्यांत येतील त्या मुदतीपर्यंत, भिकाऱ्यास वेड्यांच्या इस्पितळाच्या किंवा कुष्ठालयाच्या स्वाधीन करण्याकरिता ताबडतोब आदेश मिळविण्यासाठी ज्या संस्थेत भिकाऱ्यास अटकावून ठेवण्यात आलेले असेल त्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यास, भारताचा वेड लागलेल्या इसमाबाबत अधिनियम, १९१२ अन्वये किंवा महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ अन्वये क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

**२७. ते २९.** ** ** ** **

**३०.** (१) ** ** ** **

(२) अशा जनावराला न्यायालयासमोर हजर करण्यांत येईपर्यंत प्राण्यांस निर्दवतेने वागविण्यात प्रतिबंध करण्याबाबत अधिनिय, १८९० कलम ६ब याअन्वये नेमून दिलेल्या रुग्णशाळेत अटकावून ठेवण्यासाठी तेथे त्यास नेण्याचा, अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास किंवा इतर व्यक्तीस अधिकार आहे. भिक्षा मिळविण्यासाठी किंवा काढून घेण्यासाठी उघडी केलेली किंवा प्रदर्शित केलेली जनावरे धरणे व त्यांचीं विल्हेवाट लावणे.

(३) भिक्षा मागतांना आढळून आलेल्या व्यक्तीस ज्या न्यायालयासमोर आणण्यांत आले असेल त्या न्यायालयास असा निदेश हे याचा अधिकार आहे की, अशा जनावरास ते मुक्त करण्यास योग्य होईपर्यंत अशा रुग्णशाळेत औषधोपचार केले पाहिजेत व त्याची शुश्रूषा केली पाहिजे किंवा त्यास पांजरपोळांत पाठविले पाहिजे किंवा जर ज्या क्षेत्रांत ते जनावर आढळून आले ते क्षेत्र ज्याच्या अधिकाराखाली आहे असा पशुवैद्यकीय अधिकारी अगर प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० कलम १५ अन्वये केलेल्या नियमांनी अधिकृत केलेला असा इतर पशुवैद्यकीय अधिकारी, ते बरे होण्यासारखे नाही किंवा निर्दयतेने वागविल्यावाचून त्यास हलविणे शक्य नाही असे प्रमाणपत्र देईल तर न्यायालयास, असा निदेश देण्याचा अधिकार आहे की त्या जनावरास मारून टाकण्यांत आले पाहिजे आणि जनावराची रुग्णशाळेतून मुक्तता झाल्यावर ते जप्त करण्यात यावे असा आदेश देण्याचाहि न्यायालयास अधिकार आहे.

(४) रूग्णशाळेत शुश्रूषेसाठी किंवा औषधोपचारासाठी पाठविण्यात आलेले जनावर हे, न्यायालयाने तें पांजरपोळांत पाठविले पाहिजे किंवा ते मारून टाकले पाहिजे असा निदेश दिलेला नसल्यास, ज्या क्षेत्रांत अशी रूग्णशाळा आहे ते क्षेत्र ज्याच्या अधिकाराखाली आहे असा पशुवैद्यकीय अधिकारी अगर प्राण्यांस निर्दयतेनें वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५ अन्वयें केलेल्या नियमांनी अधिकृत केलेला असा इतर पशुवैद्यकीय अधिकारी याने तें रूग्णशाळेंतून मुक्त करण्यास योग्य आहे असे प्रमाणपत्र दिल्यावाचून अशा रुग्णशाळेतून मुक्त करता कामा नये.

**३१.** ** ** ** **

**३२.** ह्या अधिनियमान्वयें कोणतेंही काम करण्यास अधिकार दिलेल्या सर्व व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजण्यांत आले पाहिजे. व्यक्ती लोकसेवक समजणें.

**३३.** दंड प्रक्रिया संहिता १८९८ विभाग ४२ चे उपबंध शक्य असेल तेथवर, ह्या अधिनियमान्वयें. घेतलेल्या बंधपत्रास लागू असतील. सन १८९८ अधिनियम ५ अन्वयें घेतलेली बंधपत्रे.

**३४.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८ अन्वये करावयाच्या अपिलाच्या व फेरतपासणीच्या कारणांसाठीं, ह्या अधिनियमान्वये देण्यात येणारा अटकावून ठेवण्याचा आदेश (यांत कलम ५ अन्वये अटकावून ठेवण्याच्या आदेशाचा समावेश होतो) हा जितक्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याविषयी दिलेला असेल तितक्याच मुदतीच्या कैदेची शिक्षा म्हणून समजण्यांत आली पाहिजे. अपिलें.

**३५. व ३६.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**(सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक - १५)**

**[ महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ कु. आदिती तटकरे,**
महिला व बालविकास मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर